**नियमीत दिवाणी दावा क्र.१२३/२०११ मधील निशाणी क्र.७८ वरील आदेश**

( CNR : MHAH2500 0263 2011 )

वादीने सदरचा अर्ज वादींनी दावा मिळकत त्रयस्थ इसमांना विक्री केल्यामुळे त्यांना दाव्यामध्ये सामील करुन त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाचे पुष्ठ्यर्थ वादीने निशाणी क्र.७९ वर प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबीत असताना वादींनी संपुर्ण दावा मिळकत ही त्यांचे आर्थिक गरजेपोटी दावा मिळकतीचे सर्व हक्क व अधिकारांसह त्रसस्थ इसम निर्मला सुनिल थोरात यांना दि.०८.१०.२०२० रोजी दस्त क्र.४४३० अन्वये विक्री केलेली आहे व त्यामुळे सदर त्रयस्थ इसमांना दावा चालविण्याचा हक्क प्राप्त झाल्याने त्यांना वादीपणामध्ये सामील करण्याची विनंती केली आहे. वादीने त्यांचे नाव दाव्यामधून कमी करुन सदर त्रयस्थ इसमांना दाव्यामध्ये वादी म्हणून सामील करुन प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरची दुरुस्ती ही दाव्याचे योग्य निवाड्याकरीता अत्यंत महत्वाची आहे. सदर दुरुस्तीस परवानगी मिळाली नाही तर वादींचे फार मोठे नुकसान होणार आहे व त्यामुळे दाव्यांचे अनेकीकरण होईल. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी निशाणी क्र.८२ वर प्रस्तुत अर्जास म्हणून देऊन कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा नाही तसेच अर्जामध्ये नमुद केलेली कथने खोटी आहेत. वादीने दावा प्रलंबीत असताना कोणतीही परवानगी न घेता सदरचे तथाकथीत बेकायदेशीर खरेदीखत करुन दिलेले आहे त्यामुळे अर्जदारांना दाव्यामध्ये सामील करुन घेता येणार नाही. सदर खरेदीखतास लिज पेंडेंस व कॉन्ट्रॅक्ट अॅक्टच्या तरतुदींचा बाध येत आहे. तसेच खरेदीखतामध्ये वादीने दावा मिळकतीमध्ये वादग्रस्त अतिक्रमण असलेल्या क्षेत्राचा व त्याबाबत न्यायालयामध्ये दावा चालु असल्याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही. सदरच्या बेकायदेशीर खरेदीखताने त्रयस्थ इसमांना कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त होत नाही. त्रयस्थ इसमांना दाव्याचे कामी सामील करुन त्यांना दाव्याचे कामकाज

चालविता येणार नाही व अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा घेण्याबाबत त्याला कोणताही कायदेशीर हक्क अधिकार प्राप्त होत नाही. सदरचे वादी हे आता दावा मिळकतीचे मालक राहिलेले नसल्यामुळे दावा in-fructuous झालेला आहे. अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे कामी गुंतागूंत निर्माण होईल. सबब, अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादीचे व प्रतिवादी क्र.३ ते ६ यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करु नये म्हणून निरंतर मनाई साठी दाखल केला होता. त्यानंतर सदर दाव्यामध्ये मोजणीचा अर्ज मंजुर होऊन प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे दिसून येते. वादीने अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी मिळण्यासाठी दाव्यात दुरुस्ती केलेली असून दाव्यामध्ये वादीची साक्ष नोंदवलेली आहे. त्यानंतर वादीने दावा मिळकत ही त्रयस्थ इसम निर्मला थोरात यांना विक्री केल्याचे कथन प्रस्तुत अर्जामध्ये करुन वादीने स्वतःचे नाव कमी करुन खरेदीदार निर्मला थोरात यांचे नाव वादीपणात सामील करण्याचा अर्ज केलेला आहे. वादीने दावा मिळकत ही खरेदीदार यांना विकली असल्यामुळे वादीचे दावा मिळकतीवरील सर्व हक्क संपुष्टात आलेले आहेत. खरेदीदार निर्मला थोरात यांना दावा मिळकतीचे सर्व हक्क वादीने खरेदीखताअन्वये दिलेले आहेत. त्यामुळे वादी यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क हितसंबंध राहिलेला नाही. खरेदीदार यांना सदर दावा मिळकतीचे हक्क प्राप्त झाल्यामुळे त्यांना प्रतिवादींविरुध्द दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. परंतु वादीने दावा मिळकत ही खरेदीदार यांना विकल्यामुळे वादीचे नाव कमी करुन खरेदीदार यांचे नाव वादीपणात सामील केल्यास वादीने दाव्यातील केलेले कथन व दिलेला पुरावा हा अर्थहीन होईल तसेच सदरचा अर्ज हा कायद्याच्या कोणत्या चौकटीमध्ये बसतो याबाबतचा खुलासा वादीने कोठेही केलेला नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याची क्लीष्टता व गुंतागूंत वाढेल. तसेच त्यामुळे प्रतिवादींच्या हक्क हितसंबंधांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे दाव्यामध्ये वादीला पक्षकार ठेवून खरेदीदार निर्मला थोरात यांना दाव्यामध्ये सामील करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. वादी मदन बाफना यांचे नाव वादीपणातून कमी न करता खरेदी घेणार त्रयस्थ इसम निर्मला सुनिल थोरात यांना दाव्यामध्ये वादी क्र.२ म्हणून सामील करण्याची व खरेदीखताच्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2024.07.04 15:29:00 +0530

( एस. सी. साळवी )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पारनेर

दि.०४.०७.२०२४
पारनेर